महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /2020/ 3033 दिनांकः- 16 DEC 2020

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित, अनुदानित संस्था
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग. नागपूर

विषय:- शैक्षणिक वर्ष 2020-21 करिता महाडिबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या योजनांच्या कार्यवाहीबाबत.

संदर्भ :-1) मा. संचालक, तंशिसं , म.रा.मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र .18/तंशिसं/डीबीटी/2020-21/2020/377 / दि. 03/12/2020

2) या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिस/विकाना/डीबीटी-पोर्टल/2020/2798/ दि.24/11/2020

शैक्षणिक वर्ष 2018-19 पासून माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यांत येणा-या योजनांकरिता बनविण्यात आलेल्या महाडिबीटी पोर्टल व्दारे **(संकेतस्थळ- www. mahadbtmahait.gov.in)** तंत्रशिक्षण संचालनालयाकडून खालील योजना राबविण्यात येतात.

1. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
2. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाभत्ता योजना
3. उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्याकरिता शिष्यवृत्ती योजना.

**शैक्षणिक वर्ष** 2020-21 **करिता, महाडिबीटी पोर्टल वर वरील योजना, दि.** 03/12/2020 **पासून शासनाकडून सुरू करण्याबाबत संदर्भिय पत्र क्र.** 02 **अन्वये आपणांस कळविलेले आहे.**

तरी याव्दारे या कार्यालयाच्या अधिनस्त येणा-या सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, सर्व पात्र विद्यार्थ्यांनी सदर शिष्यवृत्तीचा लाभ घेण्याकरिता, खालीलप्रमाणे दिलेल्या सुचनांचे संस्थास्तरावर काटेकोरपणे पालन करून अंमलबजावणी करण्यांत यावी.

1. संस्थांनी Institute Profile अंतर्गत सर्व माहिती जसे- Fee Details etc. अद्ययावत करून पुढील कार्यवाहीसाठी पाठवावी.
2. सर्व पात्र विद्यार्थ्यांना योजनेचे अर्ज भरण्यासाठी सुचित करण्यांत यावे. तसेच संस्थांनी त्याच्या लॉगीन आयडी मध्ये प्राप्त होणारे अर्ज तपासणीसाठी प्रलंबित न ठेवता तपासणी करून पुढील कार्यवाहीसाठी पाठवावे.
3. शैक्षणिक वर्ष 2020-21 करिता **" डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना"** या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करताना, विद्यार्थी शिक्षणासाठी वसतिगृह किंवा पेईंगगेस्ट म्हणून राहात असलेबाबतची संपूर्ण शहानिशा करूनच योजनेच्या अटी व शर्ती नुसार अर्ज तपासणी ( मंजूर / नामंजूर) करावे. अपात्र विद्यार्थ्याचे अर्ज मंजूर करण्यात आले तर याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखाची राहील. याची नोंद घ्यावी.

4. विद्यार्थी केंद्र शासनाच्या (NSP Portal) व महाराष्ट्र शासनाच्या (DBT Portal)पोर्टलवरील योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभार्थी असेल याबाबत संस्थांनी योग्य ती दक्षता घ्यावी.
5. विद्यार्थ्याने एकाच वर्षाकरिता दोन-दोन योजनांचा (केंद्र व राज्य शासनाच्या अशा दोन्ही योजनांचा) लाभ प्राप्त करून घेतल्यास किंवा संस्थेमध्ये शिकत नसलेल्या विद्यार्थ्याच्या अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्याचे आढळून आल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखाची राहील, याची नोंद घ्यावी.

सत्पत्र - संदर्भ क्र. 1 चे प्रत.

(डॉ. राम निबुदे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर